मंगळवार, २९ ऑक्टोबर २०२४

तरुण भारत

# विवेकानंदच्या अंकुश हाक्केला क्रॉसकंट्री स्पर्धेत सुवर्णपदक

**कोल्हापूर :** न्यू कॉलेज, कोल्हापूर व शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे घेण्यात आलेल्या शिवाजी विद्यापीठ अंतर्गत आंतर विभागीय क्रॉस कंट्री स्पर्धेमध्ये विवेकानंद कॉलेज, कोल्हापूरचा खेळाडू कु. अंकुश हाक्के याने १० किलोमिटर अंतर तब्बल ३०.मि ४५ सेकंद मध्ये पूर्ण करत सुवर्ण पदक पटकावले. सदर खेळाडूला श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, संस्थेच्या सचिव प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांचे प्रोत्साहन लाभले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, जिमखाना विभाग प्रमुख डॉ. विकास जाधव, ज्युनिअर जिमखाना विभाग प्रमुख प्रा. संतोष कुंडले, प्रा. समीर पठाण, प्रा. प्रशांत कांबळे, महाविद्यालयाचे रजिस्ट्रार आर.बी. जोग व श्री सुरेश चरापले यांचे मार्गदर्शन लाभले.

सकाळ

# नम्रता ढाळे यांना पीएच.डी.



नम्रता ढाळे

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील इतिहास विभागातील विद्यार्थिनी नम्रता देवीदास ढाळे यांना पीएच.डी. प्रदान करण्यात आली. त्यांनी 'मराठी चित्रपटसृष्टीतील स्त्रियांच्या बदलत्या प्रतिमेचा अभ्यास (१९३२-१९८२)' या विषयावर विवेचन करणारा प्रबंध सादर केला. चित्रपटसृष्टीतील स्त्रियांच्या समस्या याबाबत आजची सेलिब्रेटी म्हणून झालेला बदल संशोधनात अभ्यासपूर्ण भर घालणारे हे योगदान आहे. त्यांना प्रा. डॉ. कविता गगराणी यांच्यासह विवेकानंद कालेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, इतिहास विभागप्रमुख डॉ. अवनीश पाटील यांचे सहकार्य लाभले.